

भगतसिंह जनअधिकार यात्रा पुस्तिका - 03

# शिक्षण आणि रोजगार आमचा जन्मसिद्ध अधिकार!





## भगतसिंह जनअधिकार यात्रा

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**

**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# शिक्षण आणि रोजगार आमचा जन्मसिद्ध अधिकार

सहयोग मूल्य : 10 रुपये

भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता प्रकाशित
मे 2023
**प्रकाशक**: परमेश्वर जाधव, संपर्क: 77983 64729
**मुद्रणस्थळ**: आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
**सहयोग मूल्य**: रु. 10/-
www.bsjayatra.com, fb.com/bsjayatra

आपला देश एका अभूतपूर्व काळातून जात आहे. खाजगीकरणाच्या, उदारवादी धोरणांच्या काळात जनतेने दीर्घ संघर्षातून मिळवलेल्या मर्यादित लोकशाही अधिकारांवर सतत हल्ला केला जात आहे, आणि मोदी सरकारच्या 9 वर्षांमध्ये तर याची गती अभूतपूर्व रूपाने वाढली आहे. जेव्हा कधी विद्यार्थी-युवक रोजगार आणि शिक्षणाच्या मागणीला घेऊन रस्त्यावर उतरतात तेव्हा त्यांच्यावर लाठ्या याप्रकारे चालवल्या जातात जणू काही ते गुन्हेगार किंवा दहशतवादी आहेत. देशात **32 कोटी** बेरोजगार आहेत आणि शिक्षण सामान्य जनतेच्या आवाक्यातून दूर जात आहे. अशामध्ये मोदी सरकारची इच्छा आहे की देशातील युवकांनी आपल्या तोंडाला कुलूप लावावे आणि "भजी तळावीत".

ज्या प्रमाणात समाजातील लोकशाही अधिकार हिरावले जात आहेत, त्याच प्रमाणात विद्यापीठे/उच्च-शिक्षण संस्थांमध्ये सुद्धा लोकशाही अधिकार संपवले जात आहेत. आता **नवीन शिक्षण धोरणाच्या** माध्यमातून मोदी सरकार शिक्षणाला पूर्णत: बाजाराच्या हवाले करण्यास उतावीळ आहे. **नवीन शिक्षण धोरणामुळे** शिक्षणाच्या क्षेत्रातील सरकारची जबाबदारी आणि उत्तरदायित्व संपवले जाईल, शिक्षणाला देशी-विदेशी भांडवलासाठी लुटीच्या अड्ड्यात बदलवले जाईल, आणि शिक्षणाच्या धार्मिकीकरणाचा रस्ता खुला केला जाईल. एकीकडे शिक्षण लोकांच्या आवाक्याबाहेर जात आहे, तर दुसरीकडे बेरोजगारी शिखरावर पोहोचली आहे. स्थिती इतकी वाईट आहे की भारताचे जॉब मार्केट अजून करोनाच्या अगोदरच्या स्तरावरही पोहोचलेले नाही, आणि मंदी अजून वाढण्याचे संकेत मिळत आहेत. जगभरात नोकरकपात-टाळेबंदीचे सत्र सुरू आहे. नफ्याचा घसरता दर रोखण्यासाठी भांडवलदारांना जनतेच्या घामाच्या कमाईतून उभे राहिलेले, नफा देऊ शकणारे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग कवडीमोल भावाने विकण्याचे काम चालू आहे. अशात आपण गप्प बसून चालेल का? शहीद भगतसिंह या देशातील धाडसी युवकांचे आदर्श आहेत. त्यांनी म्हटले होते की जर एखादे सरकार जनतेला तिच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवत असेल तर युवकांचे हे आवश्यक कर्तव्यच नाही तर अधिकार बनतो की अशा सरकारला बदलावे किंवा समाप्त करावे. आज भगतसिंहाच्या या गोष्टीतील एक-एक शब्द आपल्या समोर जळत्या प्रश्नांसारखा उभा आहे. आपण हा अन्याय सहन करत जाणार का? देशातील मेहनतीचा आणि निसर्गाचा धनाढ्यांच्या, भ्रष्टाचाऱ्यांची हाती लिलाव होऊ देणार का?

विद्यार्थी-युवकांसाठी या अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचे पहिले पाऊल आहे शिक्षण आणि रोजगाराच्या अधिकारासाठी संघर्ष करणे. आपण हे जाहीर केले पाहिजे की शिक्षण आणि रोजगार हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे, आणि याला

कोणत्याही स्थितीत मिळवूनच राहू. आमचे मानणे आहे की **शिक्षण आणि रोजगार हा देशातील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि त्याला घटनादुरुस्ती करून मूलभूत अधिकारांमध्ये सामील केले गेले पाहिजे.** प्रत्येकाला समान आणि विनामूल्य शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. **भगतसिंह जनअधिकार यात्रेची** एक प्रमुख मागणी आहे की सर्वांना समान, दर्जेदार आणि विनामूल्य शिक्षणाची आणि सर्वांना रोजगाराची हमी मिळावी. जर सरकार जनतेच्या या मूलभूत गरजा सुद्धा पूर्ण करू शकत नसेल तर ते आहेच कशाला? धनदांडग्यांच्या आणि दुसऱ्यांच्या मेहनतीवर ऐश करणाऱ्या परजीवींच्या तिजोऱ्या भरण्यासाठी?

## आजच्या काळातील शिक्षणाची अवस्था

*ज्या युवकांनी उद्या देशाच्या दोऱ्या हाती सांभाळायच्या आहेत, त्यांना आजच बुद्धीभ्रष्ट करण्याचे प्रयत्न चालू आहेत. याचा जो परिणाम होईल तो आपण स्वत:च समजला पाहिजे. आम्ही हे मानतो की विद्यार्थ्यांचे प्रमुख काम अभ्यास आहे, आणि त्यांनी त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे, पण देशाच्या परिस्थितीचे ज्ञान आणि तिला सुधारण्याच्या उपायांवर विचार करण्याची क्षमता निर्माण करणे , हे त्या शिक्षणात सामील नाही का? जर नसेल तर आम्ही त्या शिक्षणाला बिनकामी समजतो, जे फक्त कारकुनी शिकण्यासाठीच आहे.*

*— शहीद भगतसिंह*

मित्रहो, आपला आजचा काळ शिक्षणावर होत असलेल्या अभूतपूर्व हल्ल्यांचा साक्षीदार आहे. तसे तर शासक वर्गाकडून शिक्षणाच्या बाजारीकरणाची मोहीम खूप काळापासून सुरू आहे, पण सध्याच्या फॅसिस्ट कालखंडात शिक्षणाच्या बाजारीकरणाचा आणि धार्मिकीकरणाचा वेग अद्वितीय आहे. शिक्षणाची सरकारी व्यवस्था नियोजनबद्ध पद्धतीने धोरणे बनवून बरबाद केली जात आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षणाला बाजारातील माल बनवले गेले आहे. ज्यांच्याकडे पैसा आहे ते चांगल्या शाळा, कॉलेज, विद्यापीठे आणि तांत्रिक शिक्षण संस्थांपर्यंत पोहोच ठेवतात. ज्यांच्याकडे पैसा नाही ते अशिक्षित राहून, किंवा शाळेतून बाहेर पडून अकुशल किंवा अर्धकुशल कामगारांच्या फौजेत सामील होण्यास आणि ठेकेदारी पद्धतीमध्ये खटण्यास बाध्य आहेत. शिक्षणावर होणाऱ्या सरकारी खर्चात कपातीच्या मामल्यात तर मोदी सरकारने अगोदरच्या सरकारांना खूप मागे सोडले आहे.

## दरवर्षी शिक्षणाच्या बजेट मध्ये कपात


*“मला वाटते की सर्वात उत्तम शिक्षण प्रत्येकाला उपलब्ध असावे; जेणेकरून गरिबातील गरीब व्यक्ती सुद्धा सर्वोत्तम योग्यता प्राप्त करू शकेल आणि सर्वोच्च पद मिळवू शकेल.मी विद्यापीठाची दारे सर्वांसाठी खुली सोडू इच्छितो. सर्व खर्च सरकारची जबाबदारी असली पाहिजे. देशाला फौजेपेक्षा कितीतरी पटीने शिक्षणाची गरज आहे.”*

*— प्रेमचंद*

महान साहित्यिक प्रेमचंद स्वातंत्र्याच्या अगोदर अशा एका समाजाचे स्वप्न पाहत होते जिथे शिक्षणासमोर पैशांची भिंत उभी नसेल. परंतु स्वातंत्र्याच्या साडेसात दशकांनंतर शिक्षणासमोर ना फक्त पैशांची भिंत उभी आहे, उलट वर्षागणिक ती अधिकाधिक उंच होत आहे. शिक्षणावर होणाऱ्या सरकारी खर्चात अनिर्बंध कपात केली जात आहे. स्वातंत्र्यानंतर बनलेल्या बहुतांश आयोगांच्या शिफारशींमध्ये आणि शिक्षण धोरणांमध्ये शिक्षणावर सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या कमीत कमी 6 टक्के खर्च करण्याचे आश्वासन सतत दिले गेले. परंतु हा फक्त एक जुमला सिद्ध झाला आहे. 1990-91 मधील केंद्रीय बजेटमध्ये जीडीपीच्या 1.4 टक्के असलेला शिक्षणावरचा खर्च कमी होऊन 2023-24 मध्ये मोदी सरकारने 0.37 टक्के केला आहे. याचा परिणाम असेल शाळा, कॉलेज, विद्यापीठांचे खाजगीकरण आणि अधिकाधिक सरकारी शिक्षण संस्थांना स्ववित्तपोषित बनवून त्यांच्या फी इतक्या वाढवणे की सामान्य माणसांच्या मुला-मुलींना त्यामध्ये शिकण्याचे स्वप्न सुद्धा पाहता येणार नाही. मोदी सरकारने शिक्षणावरील बजेटच्या कपातीत तर अगोदरच्या सर्व सरकारांना कैक मैल मागे सोडले आहे. नुकतेच मोदी सरकारने त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटचे बजेट प्रस्तुत केले. **‘इन्होव्हेशन’, ‘डेव्हलपमेंट’, ‘गरीब कल्याण’ सारख्या आलंकारिक दिखाऊ शब्दावलीचा वापर करत प्रस्तुत केलेले हे बजेट एक जनविरोधी, विद्यार्थी-युवक विरोधी दस्तऐवज आहे.** वरवर पाहता शिक्षण बजेट 1.02 लाख कोटींवरून वाढून 1.12 लाख कोटी झाले आहे. परंतु या वाढीला महागाईच्या दरासोबत तुलना करून पाहिले असता, यात केलेला आकड्यांचा खेळ स्पष्ट होतो आणि दिसून येते की मोदी सरकारने खरेतर शिक्षण बजेट मध्ये कपात केली आहे. याला या रूपात सुद्धा समजले जाऊ शकते की आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये शिक्षणावर केंद्र सरकारचा खर्च जीडीपीच्या फक्त 0.63 टक्के होता. हा खर्च मोदी सरकारच्या 9 वर्षांमध्ये कमी होऊन आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये 0.37 टक्क्यांवर पोहोचला आहे.

याशिवाय 2013-14 पासून 2022-23 पर्यंत नऊ वर्षांच्या काळात एका सामान्य

नियमाच्या स्वरूपात मोदी सरकार द्वारे शिक्षणावर वास्तविक खर्च बजेट मधील अंदाजांपेक्षा कमीच राहिला आहे. 2020-21 मधील बजेटच्या तुलनेत वास्तव खर्च 15,092.1 कोटी रुपये कमीच होता. अशाप्रकारे एकीकडे मोदी सरकार जीडीपीच्या तुलनेत शिक्षण बजेट मध्ये सतत कपात करत आहे, तर दुसरीकडे जे अन्यायपूर्ण बजेट शिक्षणक्षेत्राकरिता दिले जात आहे, ते सुद्धा पूर्णपणे खर्च केले जात नाहीये. इतकेच नाही, मोदी सरकार बजेट कमी असल्याचे कारण देत शाळांनाही बंद करत चालली आहे. विद्यापीठांमध्ये स्ववित्तपोषित कोर्सेस सुरू करण्यासोबतच संपूर्ण शिक्षणव्यवस्थेलाच देशी-विदेशी भांडवलदारांना सोपवण्याची तयारी सुरू आहे, जिचा एक जिवंत दस्तऐवज आहे **नवीन शिक्षण धोरण – 2020.**




वरील ग्राफ मोदी सरकारच्या शिक्षण सुधारांच्या सर्व दाव्यांची पोलखोल करण्यासाठी पुरेसा आहे. शिक्षणावरील राज्य सरकारांच्या खर्चाला सुद्धा जोडले तरी हा आकडा मुश्कीलीने जीडीपीच्या तीन-साडेतीन टक्क्यांवर पोहोचतो. सतत कमी होत चाललेल्या बजेटने आधीपासूनच लाचार असलेल्या शिक्षणव्यवस्थेला अजूनच दयनीय स्थितीत पोहोचवले आहे.

एकीकडे मोदी सरकार शिक्षण बजेट मध्ये कपात करत आहे, तर दुसरीकडे शिक्षणाचे भगवीकरण जोराने सुरू आहे.

# फॅसिस्टांद्वारे इतिहासासोबत दुराचार आणि शिक्षणाच्या धार्मिकीकरणाची मोहीम

*"ज्या धरतीवर दर मिनिटाला एक मूल भुकेने वा आजाराने मरते, तेथे लोकांना प्रशिक्षित केले जाते की त्यांनी शासक वर्गाच्या दृष्टीकोनातून गोष्टींना समजावे. लोक व्यवस्थेला देशभक्तीशी जोडून पाहू लागतात आणि अशाप्रकारे व्यवस्थेच्या विरोधकांना देशद्रोही वा विदेशी एजंट बनवले जाते. जंगलाच्या कायद्याला पवित्र रूप दिले जाते, जेणेकरून पराभूत लोकांनी स्वत:च्या स्थितीलाच नियती समजावे."*

*— एदुआर्दो गालियानो*

शिक्षण हा सुसंस्कृत समाजाचा कणा असतो असे म्हणतात. समाज आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यात शिक्षणाची भूमिका खूप महत्त्वाची असते. शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे जो नवीन पिढीला वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध जाणीव, संवेदनशीलता आणि ऐतिहासिक जाणिवेने सुसज्ज करतो, नवीन पिढीला मानवी समाजाच्या कठीण व चढ-उतारांनी भरलेल्या प्रवासाची ओळख करून देतो आणि या प्रक्रियेत नवीन पिढीने लूट, शोषण आणि अन्यायाविरुद्ध लढावे यासाठी उत्प्रेरकाचे काम करतो. अशा प्रकारे शिक्षणाचे खरे ध्येय तरुणांना न्याय, समता, लोकशाही या तत्त्वांनी सुसज्ज करणे आणि त्यांना जात-धर्माच्या झगड्यांचा त्याग करण्याची चेतना देणे हेच आहे. पण आज अभ्यासक्रमात बदल करून मोदी सरकार तरुणांना दंगलखोरांच्या उन्मादी जमावामध्ये बदलू इच्छित आहे जेणेकरून मोदी सरकार 'फोडा आणि राज्य करा'च्या धोरणात यशस्वी होऊ शकेल. मिथकांना इतिहास आणि इतिहासाला मिथक बनवले जात आहे. अशा प्रकारे आजच्या सत्ताधारी वर्गाच्या हातात कैद होऊन, शिक्षण हे लूट, शोषण, अत्याचार, अन्याय यांच्या बाजूने जनमत तयार करण्याचेही एक सशक्त माध्यम बनले आहे. शासक वर्ग स्वत:चे वर्गहित लक्षात घेऊन समाजात जनविरोधी मूल्यांची मान्यता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण पद्धतीचा वापर करत आहे. म्हणूनच प्रत्येक युगात सत्ताधारी वर्ग आपल्या हितसंबंधांच्या आधारे शिक्षणपद्धतीत बदल करत आला आहे आणि या प्रक्रियेत आपल्या शासनाला न्याय्य आणि वैध ठरवण्यासाठी जनमानस घडवण्याचा प्रयत्न करत आला आहे. वसाहत काळापासून आजपर्यंतचा शिक्षणाचा इतिहास या वस्तुस्थितीची पुष्टी करतो.

आज आपण पाशवी धर्मवादी फॅसिस्ट काळात जगत आहोत आणि आपल्या राजवटीला भक्कम बळकटी देण्याच्या हेतूने फॅसिस्ट शक्तींकडून शिक्षण पद्धतीचा अत्यंत सूक्ष्म आणि व्यापक पद्धतीने वापर केला जात आहे. सामान्य कष्टकरी जनतेच्या

मुलांच्या मनात धर्मवाद आणि धार्मिक कट्टरतेचे विष कालवण्याचे काम पूर्वी संघशाखा आणि संघ पुरस्कृत शाळा-महाविद्यालयांमध्ये होत असे, आज फॅसिस्ट शक्तींकडून तेच काम सरकारी यंत्रणा वापरून कितीतरी पट वेगाने केले जात आहे. 2014 मध्ये मोदी सत्तेत आल्यापासून तीन वेळा (2017, 2019 आणि 2022) अभ्यासक्रमात मोठे बदल करण्यात आले आहेत आणि यावेळी त्याला संपूर्ण धर्मवादी रंग देण्याची योजना आहे. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एन.सी.ई.आर.टी.)ने "औचित्य" आणि विद्यार्थ्यांवरील अभ्यासक्रमाचा भार कमी करण्याच्या नावाखाली, फॅसिस्टांच्या काळ्या इतिहासासह लोकांच्या गौरवशाली इतिहासाचे महत्त्वाचे भाग, लोकांच्या लढ्याचे आणि लोकशाही अधिकारांची माहिती देणारे अनेक भाग आणि धडे काढून टाकले आहेत किंवा इतिहासाला विकृत करून प्रस्तुत केले आहे. दुसरीकडे, गुजरात आणि कर्नाटक या भाजपशासित राज्यांनी विद्यार्थ्यांना नैतिक मूल्ये आणि तत्त्वांनी सुसज्ज करण्याच्या नावाने आता शालेय अभ्यासक्रमात धार्मिक ग्रंथांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. बारावीच्या राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमातून 2002 च्या गुजरात हत्याकांडापासून ते 1975 मध्ये इंदिरा गांधींनी घोषित केलेल्या आणीबाणीपर्यंत अनेक भाग एकतर काढून टाकण्यात आले आहेत किंवा त्याची पाने कमी करण्यात आली आहेत. काढून टाकलेल्या मुद्द्यांमध्ये गुजरात हत्याकांड, आणीबाणीच्या काळात राजकीय अटकसत्र, संसद विसर्जित करणे, प्रसारमाध्यमांवर नियंत्रण, तुरुंगातील छळ आणि हत्या, गरिबांचे विस्थापन, सक्तीने नसबंदी आणि फर्मानशाहीवर टिका यांचा समावेश आहे. आता विद्यार्थ्यांना ही सत्ये अभ्यासक्रमातून शिकता येणार नाहीत. कामगार चळवळीच्या प्रकरणातून आणीबाणीची चर्चा देखील काढून टाकण्यात आली आहे, ज्यामध्ये कामगार संघटनांच्या सर्व क्रियाकलापांवर बंदी घालण्याबद्दल उल्लेख होता. सहावी ते बारावीच्या अभ्यासक्रमातून प्रतिकार चळवळी आणि सामाजिक चळवळींवर चर्चा करणारी अनेक प्रकरणे काढून टाकण्यात आली आहेत. उत्तराखंडचे चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, महाराष्ट्रातील दलित पँथर, आंध्र प्रदेशातील दारूबंदी आंदोलन इत्यादी प्रकरणे काढून टाकण्यात आली आहेत किंवा त्यांची पाने कमी करण्यात आली आहेत. या चळवळींच्या स्वतःच्या कमतरता होत्या, त्याही दाखविल्या पाहिजेत; परंतु **त्यांना पूर्णपणे काढून टाकणे हा जनप्रतिकाराचा इतिहास शिक्षणातून पुसून टाकण्याचा प्रयत्न आहे.** फॅसिस्ट सर्वाधिक घाबरतात ते जनतेच्या प्रतिकाराला. त्यांनी जनप्रतिकाराचा इतिहास पुसून टाकल्याने जनप्रतिकाराच्या शक्यता पुसल्या जातील असे नाही. पण प्रतिकाराचा इतिहास भावी पिढ्यांना अन्यायाविरुद्ध लढायला शिकवतो हे नक्की. संघ परिवाराचा उद्देश लहान मुले आणि

तरुणांना प्रश्न विचारायला शिकवणे नसून आज्ञाधारकपणा शिकवणे हा आहे. एवढेच नाही तर आता भारतीय संस्कृती जाणून घेण्याच्या आणि समजून घेण्याच्या नावाखाली राजस्थानातील शाळांमध्ये दर शनिवारी धर्मगुरूंची प्रवचने होणार! **ज्या शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळाही नाहीत, त्या शाळांमध्ये धर्मगुरूंच्या प्रवचनामागे काय हेतू असू शकतो, हे आता सहज लक्षात येईल.**

**नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत** मोदी सरकारने शिक्षणाच्या फॅसिस्टीकरणाची मोहीम अजून तीव्र केली आहे. सध्याचा 10+2 पॅटर्न रद्द केला जाईल आणि 5+3+3+4 पॅटर्न लागू केला जाईल. 3-6 वयोगटातील मुलांना 'सुरुवातीच्या बालवयातील संगोपन आणि शिक्षण' (अर्ली चाइल्डहुड केअर अ‍ॅंड एज्युकेशन) दिले जाईल ज्यासाठी अंगणवाडी केंद्रे जबाबदार असतील आणि त्यासाठी मोठ्या संख्येने स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि एनजीओची मदत घेतली जाईल. एकीकडे याचा अर्थ असेल की शाळांमधून निर्गुंतवणूक होईल आणि दुसरीकडे मानधनाच्या नावाखाली तथाकथित "सामाजिक कार्यकर्ते" म्हणवलेल्या तरुणांच्या बेरोजगारीचा फायदा घेऊन त्यांचे अतिशोषण केले जाईल. त्याच वेळी, शिक्षणाचा स्तर देखील खूप खाली जाईल. तसेच, या धोरणाद्वारे, संपूर्ण प्रक्रियेत बालमनांमध्ये धार्मिक कट्टरता आणि धर्मवादाचे विष कालवण्यासाठी आर.एस.एस.ला कोवळ्या मनांची संपूर्ण रोपवाटिका सोपवली जात आहे. म्हणूनच या शैक्षणिक धोरणात 3 ते 6 वयोगटातील मुलांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणावर जास्त भर दिला जात आहे.

## प्राथमिक सुविधांच्या कमतरतेशी झगडणारी सरकारी प्राथमिक शिक्षण व्यवस्था

*"प्रतिभेला जिवंत गाडणे कर्तव्य मानणाऱ्या आणि गाढवांसमोर द्राक्षे उधळण्यात धन्यता मानणाऱ्या समाजाचे अस्तित्व आपण क्षणभरही सहन करावे का?"*

— राहुल सांकृत्यायन

सरकारच्या कारवायांमुळे देशातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहे. सर्व सरकारी आणि गैरसरकारी अहवाल आणि खुद्द सरकारच्या प्रतिनिधींनी संसदेत मांडलेले अहवाल हे शिक्षण सुधारणेचे सर्व दावे उघडे पाडतात. **शिक्षण हक्क कायदा-2009** अंतर्गत, 6-14 वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हा औपचारिकपणे मूलभूत अधिकार बनल्याच्या कायदेशीर लप्फाजी आडून खरे सत्य दडवले गेले आहे. ज्या सरकारी शाळांमध्ये मुले शिकतात, तेथे शिक्षक,

स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, प्रयोगशाळा, वगैरे मूलभूत सुविधांची सुद्धा योग्य सोय नाहीये. शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागानुसार, केंद्र आणि राज्य सरकारद्वारे 10 लाख 32 हजार शाळा चालवल्या जात आहेत. देशातील एकूण कार्यरत **शाळांपैकी 68.48 टक्के सरकारी आहेत, परंतु सरकारी शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांची संख्या एकूण कार्यरत शिक्षकांच्या केवळ 50 टक्के आहे.** त्याच वेळी, देशभरात 22.38 टक्के शाळा खाजगीरित्या चालवल्या जात आहेत आणि 37.1 टक्के शिक्षक खाजगी क्षेत्रात कार्यरत आहेत. **सरकारने लोकसभेत दिलेल्या उत्तरानुसार देशातील प्राथमिक शाळांमध्ये 9,07,585 शिक्षकांची कमतरता आहे. त्याचबरोबर उच्च प्राथमिक शाळांमध्ये एक लाखाहून अधिक मान्यताप्राप्त शिक्षकांची पदे रिक्त आहेत. म्हणजेच सरकारने या जागांवर भरती केली तर पदवी घेऊन रस्त्यावर टाचा घासत फिरणाऱ्या सुमारे 11 लाख सक्षम तरुणांना तातडीने रोजगार मिळू शकतो.**

नवोदय आणि केंद्रीय विद्यालयही आता सरकारी उदासीनतेला बळी पडत आहेत. सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, 30 जून 2022 पर्यंत केंद्रीय विद्यालयांमध्ये एकूण 12,044 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची 1322 पदे रिक्त आहेत. नवोदय विद्यालयातील रिक्त पदांची संख्याही वर्षानुवर्षे वाढत आहे. 2019 च्या तुलनेत 2020 मध्ये नवोदय विद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदांमध्ये सुमारे 8 टक्के वाढ झाली आहे. 2019 मध्ये नवोदय विद्यालयात शिक्षकांची एकूण 3160 पदे रिक्त होती, जी 2020 मध्ये 3414 पर्यंत वाढली. केंद्रीय आणि नवोदय विद्यालयांमध्ये एकूण मंजूर पदे विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरामध्ये आधीच खूपच कमी आहेत, त्यापैकी सुमारे 40 टक्के शिक्षक आणि शिक्षकेतर पदे रिक्त आहेत.

| **राज्य** | **शिक्षकांची रिक्त पदे** |
|---|---|
| झारखंड | 38.39 टक्के |
| बिहार | 34.37 टक्के |
| पश्चिम बंगाल | 33.01 टक्के |
| मध्य प्रदेश | सुमारे 30 टक्के |
| छत्तीसगड | सुमारे 30 टक्के |
| दिल्ली | 24.96 टक्के |
| उत्तर प्रदेश | 22.99 टक्के |

## संगणक, वाचनालय, प्रसाधनगृह व खेळाच्या मैदानाची स्थिती

'ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' (असर) च्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की देशातील सुमारे 79 टक्के शाळांमध्ये संगणक नाहीत आणि ज्या शाळांमध्ये ते आहेत, त्यापैकी केवळ 6.5 टक्के शाळा संगणक वापरत आहेत. वाचनालयाबद्दल बोलायचे झाले तर, 2014 मध्ये सरासरी 100 शाळांपैकी 32 शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वापरासाठी ग्रंथालये होती, ज्यांची संख्या 2018 मध्ये घटून 27 झाली. जम्मू-काश्मीर, बिहार, ओरिसा आणि झारखंडमधील 25 टक्क्यांपेक्षा जास्त सरकारी शाळांमध्ये खेळण्यासाठी मैदाने नाहीत आणि ही कमी-अधिक प्रमाणात संपूर्ण देशाची हीच स्थिती आहे. **केवळ 5.8 टक्के प्राथमिक आणि 30 टक्के माध्यमिक शाळांमध्ये क्रीडा शिक्षक आहेत. सुमारे 45 टक्के प्राथमिक आणि 29 टक्के उच्च प्राथमिक शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचे क्रीडा साहित्य नाही.** अशा स्थितीत देश उत्कृष्ट खेळाडू कसे घडवू शकतो? खेळ ही केवळ श्रीमंतांची मालमत्ता बनला आहे. मोदी सरकारला विद्यार्थी-युवकांच्या भवितव्याची किती काळजी आहे, याचा अंदाज सहज बांधता येतो.

| **प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमधील सुविधा (% मध्ये), स्रोत: ASER-2018** | | **2010** | **2014** | **2016** | **2018** |
|---|---|---|---|---|---|
| **लायब्ररी** | नाही | 37.4 | 21.9 | 24.6 | 25.8 |
| | आहे पण वापरात नाही | 24.7 | 37.4 | 32.9 | 37.3 |
| | वापरात आहे | 37.9 | 40.7 | 42.6 | 36.9 |
| **संगणक** | नाही | 84.2 | 80.4 | 80.0 | 78.7 |
| | आहे पण वापरात नाही | 7.2 | 12.6 | 11.9 | 14.8 |
| | वापरात आहे | 8.6 | 7.0 | 8.1 | 6.5 |
| **पिण्यायोग्य पाणी** | नाही | 17 | 13.9 | 13.5 | 13.9 |
| | उपलब्ध पण वापरात नाही | 10.3 | 10.5 | 10.8 | 11.3 |
| | वापरात आहे | 72.7 | 75.6 | 75.2 | 74.8 |

शिक्षकांची तीव्र टंचाई, शाळांना पुरवल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधांमध्ये झालेली घट, पायाभूत सुविधांची दुरवस्था यांचा एकत्रित परिणाम म्हणजे एकच शिक्षक एकाच वेळी वेगवेगळ्या अभ्यासक्रमाच्या, मानसिक क्षमतेच्या आणि वेगवेगळ्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवत आहे. 2010 मधील 55 टक्क्यांच्या तुलनेत 2018 मध्ये, 63 टक्क्यांपेक्षा जास्त प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता दोनची मुले इतर वर्गांसोबत बसली होती. बहुतांश प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये मिश्र वर्ग चालवले जात आहेत. देशभरातील प्राथमिक शाळांची वाईट स्थिती खालील तक्त्यावरून समजू शकते.

| **मिश्र वर्ग (% मध्ये आकडेवारी) स्रोत: ASER-2018** | **2010** | **2014** | **2018** |
|---|---|---|---|
| ज्या शाळांमध्ये इयत्ता 2 चे विद्यार्थी एक किंवा अधिक इतर इयत्तांसह बसतात | 55.2 | 62.8 | 63.4 |
| ज्या शाळांमध्ये इयत्ता 4 चे विद्यार्थी एक किंवा अधिक इतर इयत्तांसह बसतात | 49 | 56.8 | 58 |

वरील आकडेवारी देशातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था उद्‌ध्वस्त झाल्याची साक्ष देत आहेत. हे दुरुस्त करण्याऐवजी मोदी सरकार शाळा बंद करण्याचा किंवा दोन किंवा अधिक शाळांचे एकात विलीनीकरण करण्याचा विचार करत आहे. **हरियाणातही चिराग योजनेद्वारे याची सुरुवात झाली आहे**. महाराष्ट्रात सुद्धा अशाच प्रकारे सरकारी शाळांना दर्जाहीन बनवून, पालकांना खाजगी शाळांकडे जाण्यास भाग पाडल्यानंतर आता प्रत्येक जिल्ह्यात कमी पटसंख्येचे कारण देऊन शेकडो झेडपी शाळा बंद केल्या जात आहेत. महानगरपालिकांना सुद्धा त्यांच्या शाळा खाजगी-सार्वजनिक भागीदारीच्या नावाखाली खाजगी करण्याची मुभा देण्यात आली होती. अशाप्रकारे शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण होत आहे. आणि खासगी शाळा तर लुटीचे अड्डेच बनल्या आहेत. लोकांच्या आर्थिक स्थितीनुसार बाजारपेठेत विविध स्तराच्या खासगी शाळा "शिक्षणाचा माल" घेऊन उभ्या आहेत, ज्यांनी जनतेच्या खिशातून शेवटचा रुपया सुद्धा काढून घेण्याचा निर्धार केला आहे.

# मोदी सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020: शिक्षणावर आणखी एक हल्ला

**नवीन शैक्षणिक धोरण**-2020 भेदभाव करणारी दुहेरी शिक्षण व्यवस्था संपवून न्याय आणि समानतेवर आधारित शिक्षण प्रणाली लागू करण्याच्या नावाखाली महागड्या खाजगी शाळांचे शोषण करणारे जाळे तर चालू ठेवतेच, उलट त्याला अधिक मजबूतही करते. **सर्वांसाठी शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याऐवजी पीपीपी मॉडेल अंतर्गत त्यालाही नफ्याच्या स्वाधीन केले आहे.** नवीन शिक्षण धोरणाच्या माध्यमातून गुणवत्ता वाढीच्या नावाखाली शिक्षणातून सरकारची जबाबदारी पूर्णपणे संपवून टाकण्याचा मोदी सरकारचा इरादा आहे. जरी हे धोरण 2030 पर्यंत 100 टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्याबद्दल बोलत असले तरी दुसरीकडे **50 पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या सरकारी शाळांचे विलीनीकरण किंवा बंद करण्याची शिफारस** देखील करते. या शैक्षणिक धोरणामुळे आधीच उद्ध्वस्त झालेले प्राथमिक शिक्षण पूर्णत: खाजगी भांडवलाच्या अधिपत्याखाली येणार हे स्पष्ट आहे. **समान आणि मोफत शिक्षणाची चर्चा पुस्तकीच** राहील.

## नवे शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण

मोदी सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण संस्थांमधील उरल्यासुरल्या लोकशाहीचाही गळा घोटला जाणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020 लागू झाल्यानंतर उच्च शिक्षणाची स्थिती अधिक बिकट होणार आहे. आधीच लागू केलेली सेमिस्टर पद्धत, एफ.वाय.यु.पी., सी.बी.सी.एस., एच.ई.सी.आय., यु.जी.सी. च्या जागी एच.ई.सी.आय. इत्यादी योजना म्हणजे शिक्षणाचा जागतिक व्यापार सुलभ करण्यासाठी **भारताच्या शिक्षण पद्धतीला अमेरिकन पद्धतीनुसार साचेबद्ध करण्याचा प्रयत्न होता.** संघी "राष्ट्रवाद्यां"च्या पायजम्याचा प्रत्येक नाडा खरेतर अमेरिकेतून आयातीत आहे! नवीन शिक्षण धोरण लागू झाल्यानंतर आता **देशी-विदेशी शिक्षण माफिया देशात गुंतवणूक करून आपले कॅम्पस उभारू शकतील** आणि आधीपासूनच सोयीची असलेली शिक्षण रचना थेट गिळंकृत करू शकतील. शिक्षणाच्या मूलभूत संरचनेबद्दल तर काय बोलावे, इथे तर शिक्षकांचीच वानवा आहे. **केंद्रीय आणि राज्य विद्यापीठांमध्ये सुमारे 70 हजार प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत.**

या शैक्षणिक धोरणात देशातील टॉप 100 विद्यापीठांमध्ये ऑनलाइन दूरस्थ शिक्षण

देण्याची चर्चा करण्यात आली आहे. धोरणात दूरस्थ शिक्षणाच्या मूल्यांकन, नियोजन, आणि प्रशासनासाठी (शालेय आणि उच्च शिक्षण दोन्हींच्या) राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम, एन.ई.टी.एफ.) या एका स्वायत्त संस्थेची स्थापना करण्याची चर्चा आहे. हे धोरण एन.ई.टी.एफ.च्या निधीपुरवठ्याबद्दल काहीही स्पष्ट करत नाही, याचा अर्थ असा की त्याचा बोजा विद्यार्थ्यांवर लादला जाईल. ऑनलाइन दूरशिक्षणाच्या अंमलबजावणीचा थेट अर्थ असा आहे की इंटरनेटची अनुपलब्धता, गॅजेटची अनुपलब्धता यामुळे दूरवरच्या खेड्यांमध्ये राहणारे लाखो विद्यार्थी शिक्षणापासून सरळ दूर केले जातील. दुसरे म्हणजे, जेव्हा विद्यार्थी विद्यापीठात राहणार नाहीत, तेव्हा ते सरकारच्या जनविरोधी धोरणांविरुद्ध एकजुटीने आवाज उठवू शकणार नाहीत. निदान मोदी सरकारला तरी असे वाटते. एकूणच, **'नवीन शैक्षणिक धोरण 2020' हे जनतेच्या हक्कांप्रती नाही तर मोठ्या भांडवलाप्रती समर्पित आहे.** नवीन शैक्षणिक धोरणाचा शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर नकारात्मक परिणाम होणार आहे.

शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून मोदी सरकारने विद्यापीठांमध्ये बोर्ड ऑफ गव्हर्नर्स (बीओजी) ची नवीन पद्धत सुचवली आहे, ज्यामध्ये देशातील "प्रतिष्ठित" लोक असतील आणि हे मंडळ कोणत्याही प्रकारे विद्यापीठ समुदायाला उत्तरदायी राहणार नाही. बीओजीचे हे "प्रतिष्ठित" लोक शिक्षणाशी निगडित असलेच पाहिजेत असेही नाही. बीओजीला फी ठरवण्याचे, उच्च शिक्षण संस्थेच्या प्रमुखासह इतर नियुक्त्या करण्याचे आणि प्रशासनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार असतील. शासनाचे हे मॉडेल स्वायत्ततेला आणि शैक्षणिक दर्जाला एकीकडे केंद्रीकृत करेल आणि दुसरीकडे नष्ट करेल. विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शिक्षण आयोग स्थापन केला जाईल, ज्याचे अध्यक्ष शिक्षण मंत्री असतील आणि राज्य सरकारांच्या संस्थांवरही केंद्राचे नियंत्रण असेल. आयोगाच्या सदस्यांची निवडही प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती करेल. **म्हणजेच संपूर्ण देशात केजी ते पीजीपर्यंत संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर एकाच हुकूमशहाची सत्ता असेल.** एकीकडे या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून मोदी सरकार विद्यापीठांमध्ये प्रशासकीय केंद्रीकरणाला चालना देत आहे, तर दुसरीकडे शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक-प्रशासकीय आणि आर्थिक स्वायत्तता देण्याबद्दल शिक्षण धोरण बोलत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचा मूळ मसुदा जीडीपीच्या 6 टक्के आणि केंद्रीय अर्थसंकल्पाच्या 10 टक्के शिक्षणावर खर्च करण्याविषयी बोलतो, परंतु त्यात असेही म्हटले आहे की जर करसंकलन कमी असतील तर इतका खर्च करणे शक्य नाही. एकीकडे हे धोरण शिक्षणाला प्रशासकीय तावडीत कैद करण्याकडे झुकत आहे, तर

दुसरीकडे आर्थिक स्वायत्ततेचा जप करत आहे. वित्तासाठी या धोरणाने विद्यापीठाला भांडवलदार, बँका, देशी-विदेशी कॉर्पोरेट घराणे इत्यादींकडून पैसे मागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे, ज्याची मूळ रक्कम विद्यापीठाला जमा करावी लागेल आणि व्याज सरकार भरेल. जो पैसे देईल तो संस्थांवरही त्याच्या अटी लादणार हे उघड आहे. या संस्थांमध्ये अभ्यासक्रम, पुस्तके आणि शिक्षकांची क्षमता आणि शिक्षकांचा दर्जा याबाबतचे निर्णयही हेच धनको घेतील, मग ते विद्यार्थी, समाज आणि देशाच्या हिताचे असोत वा नसोत. उच्च शिक्षण सुधारण्यासाठी, 'उच्च शिक्षण वित्तीय संस्था (एच.ई.एफ.ए., हेफा)' ची स्थापना करण्यात आली आहे, जिचे बजेट 2021-22 मध्ये कमी करून 2,100 कोटी करण्यात आले आहे. 2020-21 मध्ये हे बजेट 2,750 कोटींचे होते पण आश्चर्य म्हणजे यापैकी केवळ 250 कोटी खर्च झाले. खरेतर **हेफा आता अनुदानाऐवजी विद्यापीठांना कर्ज देईल, ज्याची त्यांना 10 वर्षांच्या आत परतफेड करावी लागेल.** सरकार उच्च शिक्षणाच्या बजेटमध्ये सातत्याने कपात करत आहे. सरकारचे म्हणणे आहे की फी वाढ करून किंवा इतर कोणत्याही मार्गाने विद्यापीठाला स्वतःचा निधी उभा करावा लागेल (ज्याचा बोजा शेवटी विद्यार्थ्यांवरच पडेल). खासगी विद्यापीठांना अभ्यासक्रम, प्रशासकीय व्यवस्था, शुल्क इत्यादी ठरवण्याची स्वायत्तता असेल, आणि अशाप्रकारे खासगी विद्यापीठांमध्ये सरकारचा काहीच हस्तक्षेप राहणार नाही. **याचा अर्थ असा की या खासगी विद्यापीठांचे दरवाजे सर्वसामान्य कामकरी वर्गातील लोकांसाठी कायमस्वरूपी बंद होतील.**

मध्यमवर्गीय जे विद्यार्थी पैशाच्या जोरावर खासगी शिक्षणाची सुविधा घेऊन उच्च शिक्षण घेतील, त्यांच्यासाठी सुद्धा भविष्यात संकट आ वासून आहे. देशातील अनेक विद्यार्थी एमएस्सी, पीएचडी, पोस्ट-डॉक्टरेट करत आहेत, त्यांना त्यांच्या प्रतिभेचा योग्य दिशेने वापर करण्याची संधी मिळाली तर ते नक्कीच काहीतरी नवीन करू शकतात, परंतु आज त्यांच्यापैकी बहुतेक विद्यार्थी पदवी घेतल्यानंतर बँका, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादीमध्ये नोकरी करण्यासाठी आपल्या प्रतिभेचा बळी देत आहेत. **या गुणवंत विद्यार्थ्यांच्या वर्षानुवर्षांच्या मेहनतीची चेष्टाच आहे की देशाचा बनावट पदवीधारक प्रधानमंत्री त्यांना भजी तळण्याचा सल्ला देत आहे.** स्वायत्ततेच्या नावाखाली खाजगीकरण, विविध महत्त्वाचे प्रकल्प बाजूला सारून त्यांना सेल्फ फंडींगच्या यादीत टाकणे, फेलोशिप्समध्ये मोठी कपात करणे, उच्च शिक्षणाची दारे देशी-विदेशी भांडवलदारांना खुली करणे, या मार्गाने उशिरा का होईना उच्च शिक्षणही त्याच दलदलीत पोहोचेल जिथे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था आधीच पोहोचली आहे.

**यावर एकच उपाय आहे: शिक्षणाच्या हक्कासाठी संघर्षाचा मार्ग! सरकारने**


**प्रत्येक स्तरावर प्रत्येक नागरिकाला समान आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे आणि त्यासाठी खाजगीकरण संपवून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे. आम्ही कोणतीही अशक्य गोष्ट किंवा नवीन व्यवस्था मागत नाही आहोत. अनेक भांडवली देशांनीही त्यांच्या नागरिकांना हा कायदेशीर अधिकार दिला आहे. हे नक्कीच शक्य आहे. ऊरुग्वे, अर्जेंटिना, ग्रीस, ब्राझील, पोलंड, हंगेरी आणि अगदी संकटात सापडलेला श्रीलंका सुद्धा प्रत्येक नागरिकाला सर्व स्तरांवर मोफत शिक्षण देत आहेत. आपण मानसिक गुलामी सोडून हे समजले पाहिजे की आपण आपल्या शिक्षण, वैद्यकीय सुविधा, घर इत्यादीची किंमत कोट्यवधी रुपयांच्या रूपात अप्रत्यक्ष कर भरून अगोदरच चुकवलेली असते. केवळ अंबानी-अदानींना भेटवस्तू देण्यासाठी सरकार कोट्यवधी रुपये टॅक्स म्हणून जमा करत असेल, तर अशा सरकारला सत्तेत राहण्याचा काहीच अधिकार नाही.**

## वाढत्या बेरोजगारीने हैराण देशातील युवक

आपल्या दैनंदिन जीवनाच्या संघर्षात उपजीविकेचा प्रश्न सर्वात मोठा आहे आणि या प्रश्नावर भारताची परिस्थिती अत्यंत संकटग्रस्त आहे. सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रात एकाएका पदासाठी हजारो बेरोजगार तरुणांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. काही हजार पदांच्या रिक्त जागांसाठी कोट्यवधी तरुण अर्ज करतात तेव्हा परिस्थिती किती गंभीर आहे हे समजते. रोजगाराच्या मुद्द्यावरही व्होट बँकेचे राजकारण खूप चालते. **भाजप सुद्धा 2014 मध्ये सत्तेवर आला होता तेव्हा दरवर्षी 2 कोटी नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते.** पण रोजगार देणे सोडाच, गेल्या नऊ वर्षांत सरकारी विभाग, सार्वजनिक क्षेत्रे, महामंडळे यांपासून ते खासगी क्षेत्रापर्यंत अभूतपूर्व छाटणी झाली आहे. या छाटणीचे प्रमाण यावरून समजू शकते की ट्विटरने भारतातील 80 टक्के कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. अलीकडेच, अमेझॉनने आपल्या 18,000 आणि एच.पी.ने आपल्या 6,000 हून अधिक कर्मचार्यांना काढून टाकण्याबद्दल बोलले आहे. जुलै 2022 पासून, मायक्रोसॉफ्टने तीन वेळा आणि नेटफ्लिक्सने दोनवेळा छाटणी केली आहे. हार्ड ड्राइव्ह निर्माती कंपनी सीगेटने 3,000 हून अधिक लोकांना कामावरून काढून टाकले आहे. परिस्थिती अशी आहे की, देशातील सर्वाधिक रोजगार देणारा विभाग असलेल्या रेल्वेमध्ये गेल्या सात वर्षांत दीड लाखांहून अधिक पदे रद्द करण्यात आली असून, उर्वरित मंजूर पदांपैकी तीन लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत. इतर विभागांचीही हीच अवस्था आहे. **जुलै 2022 मध्ये, कर्मचारी खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत सांगितले**

**की मोदी सरकारच्या 8 वर्षांमध्ये सुमारे 22.5 कोटी लोकांनी नोकऱ्यांसाठी अर्ज केले होते, ज्यापैकी फक्त 7.22 लाख लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या.**

एवढेच नव्हे तर आपल्या 'राष्ट्रवादी' मोदी सरकारने 'अग्निवीर' या नावाने लष्करात कंत्राटी पद्धतीने सैनिक भरती करण्याची योजना लागू केल्यानंतर आता हाच प्रयोग सर्व बँका आणि इतर विभागांनाही लागू करण्याचे काम सुरू आहे. भजी तळण्याला रोजगार म्हणण्यापासून ते कर्मचार्यांना पेन्शन आणि सुविधांपासून वंचित ठेवणारे फॅसिस्ट मोदी सरकारच 'अग्निवीर' सारखे 'रोजगार' निर्माण करू शकते. मोदी सरकारच्या या धोरणामध्ये भविष्यातील सुरक्षिततेची कोणतीच हमी असणार नाही आणि बहुसंख्याकांच्या भविष्यातील सुरक्षिततेच्या खोट्या आश्वासनाखाली धार्मिक अल्पसंख्याक, राष्ट्रीयता, समुदाय किंवा वंश यांना लक्ष्य केले जात राहील.




तसे पाहता, भांडवलशाही व्यवस्था ज्या संरचनात्मक आर्थिक संकटाची शिकार आहे, त्यात रोजगार निर्मितीची शक्यता सतत कमी होत आहे. **रिझर्व बँकेच्या अहवालात असे म्हटले आहे की 1980 ते 1990 पर्यंत रोजगार वाढीचा वार्षिक दर 2 टक्के होता. सन 1990 ते 2010 पर्यंत, रोजगार वाढीचा वार्षिक दर 1.7 टक्क्यांवर घसरला. सन 2000 ते 2010 पर्यंत, रोजगाराच्या वाढीचा दर 1.3 टक्क्यांवर घसरला. सन 2010 ते 2020 पर्यंत रोजगाराच्या वाढीचा दर आणखी कमी होऊन तो 0.2 टक्क्यांवर आला आहे.**

दुसरीकडे सरकार बेरोजगारीच्या दराच्या आकडेवारीमागे खरी बेरोजगारी लपवण्याचे काम करत आहे. खरेतर, भारतात नोकऱ्या शोधणाऱ्या लोकांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. भारतात आधीच कामगार फौजेचा सहभाग दर (लेबर फोर्स पार्टीसिपेशन रेट) कमी आहे. डिसेंबर 2021 मध्ये हा दर आणखी घसरला आणि 40 टक्क्यांच्या धोकादायक आकड्यावर पोहोचला. याचा अर्थ असा की भारतातील काम करण्याच्या वयातील अर्ध्याहून अधिक लोकांनी काम शोधणे सोडून दिले आहे. याचा अर्थ असा नाही की या लोकसंख्येला आता रोजगार नको आहे आणि त्याच्या अंगणात

अचानक पैशाचे झाड उगवले आहे. असे तेव्हा होते जेव्हा रोजगाराच्या शोधात असलेला माणूस खचून जातो आणि हातगाडी वा ठेला लावून, रिक्षा चालवून, कशातरी प्रकारे पोटाची खळगी भरतो आणि शिक्षण, आरोग्य, निवास इत्यादी गरजेच्या सोयीसुविधांशिवाय उपासमारीच्या रेषेजवळ जीवन जगत अकाली मृत्यूला बळी पडण्याकडे जातो!




कामगार फौजेचा सहभाग दर समजून घेण्यापूर्वी कामगार फौज समजून घेणे आवश्यक आहे. 15 ते 64 वर्षे वयोगटातील असे सर्व लोक जे एकतर कोणतीतरी नोकरी करत आहेत किंवा करू इच्छितात, ते कामगार फौजेचा भाग आहेत. भारतातील कामगार फौजेतील सहभागाचा दर जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे, आणि त्यात सुद्धा सातत्याने घट होत आहे. जगभरातील कामगार फौजेतील सहभागाचा दर सुमारे 60 टक्के आहे. म्हणजेच, काम करण्यायोग्य वयाच्या सर्व लोकांपैकी 60 टक्के लोक एकतर काम करत आहेत किंवा कामाच्या शोधात आहेत. मात्र गेल्या दहा वर्षांत भारतातील कामगार फौजेतील सहभागाचा दर कमी होत डिसेंबर2021 मध्ये तो 40 टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. पाच वर्षांपूर्वी हा दर 47 टक्के होता. कामगार फौजेच्या सहभाग दरातील या मोठ्या घसरणीमुळे, सरकारतर्फे प्रस्तुत बेरोजगारीचा दर हा रोजगार क्षेत्रातील अस्वस्थतेचे चुकीचे चित्र मांडत आहे.

प्रत्यक्षात सरकारी बेरोजगारीचा दर हा कामगार फौजेतील सहभाग दराच्या आधारे मोजला जातो. उदाहरणार्थ, जर नोकरी करण्यायोग्य वयाचे 100 लोक असतील परंतु त्यापैकी फक्त 60 लोकांना काम करायचे असेल, तर कामगार फौजेतील सहभाग दर 60 टक्के होईल. जर या 60 पैकी 6 जणांना काम मिळाले नाही, तर बेरोजगारीचा दर 10 टक्के मानला जाईल. आता कल्पना करा की जर कामगार फौजेतील सहभाग दर 40 टक्के पर्यंत घसरला, म्हणजे देशातील फक्त 40 टक्के लोक काम करत आहेत किंवा रोजगार शोधत आहेत, आणि या 40 पैकी 4 लोकांना काम मिळाले नाही तरीही बेरोजगारीचा दर 10 टक्केच असेल. यामुळे असे वाटेल की नोकऱ्यांच्या आघाडीवर कोणतीही महत्त्वाची समस्या नाहीये. तर हा आहे सरकारने चालवलेला आकड्यांचा

खेळ. वरील उदाहरणात सत्य तर हे आहे की आता सहा ऐवजी फक्त चार लोक बेरोजगार दिसत असले तरी त्यांच्या व्यतिरिक्त 20 लोक असे आहेत ज्यांनी काम शोधणे सोडून दिले आहे!

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सी.एम.ई.आय.) या अर्थव्यवस्थेवर नजर ठेवणाऱ्या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, भारतातील अर्थव्यवस्थेत सहभागी होणाऱ्या कामगारांचा हिस्सा 2016 च्या तुलनेत 15टक्क्यांनी कमी झाला आहे.

**ज्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे रोजगार मिळाला आहे त्यांची काय अवस्था आहे?** देशात रोजगार असलेल्या लोकसंख्येचा मोठा हिस्सा **असंघटित क्षेत्रात** कार्यरत आहे. या लोकसंख्येसाठी ना कामगार कायदा आहे, ना इतर कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षितता. पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे ऑफ इंडिया, 2021 नुसार, देशात सुमारे **दहा कोटी रोजंदारी कामगार आणि सुमारे पाच कोटी पगारदार कामगार कोणत्याही लेखी कराराशिवाय काम करत आहेत.** नियमित स्वरूपाची बहुतांश कामे नियमित कामगारांच्या जागी आउटसोर्सिंगद्वारे केली जात आहेत. 2004 पासून, आउटसोर्स कामगारांच्या संख्येत 40 टक्के वाढ झाली आहे.

मोदी सरकारने बेरोजगारांना "स्वयंरोजगाराचा" गुंगारा देण्याच्या, आणि 'स्टार्टअप' व 'मेक इन इंडिया'चा जुमला खेळण्यामागचे सत्य हे आहे की भारतातील **95 टक्के स्टार्टअप वर्षभरही टिकत नाहीत. उरलेल्या स्टार्टअप्सपैकी 85 टक्के कंपन्यांचे मासिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे.** 10,000 रुपयांपेक्षा कमी उत्पन्नावर जगणारी ही कोट्यवधी लोकसंख्या कशीबशी फक्त दोन वेळच्या भाकरीची तरतूद करू शकते. या उत्पन्नात उत्तम शिक्षण, निवास, पौष्टिक आहार, मनोरंजनाचा तर विचारही करू शकत नाही. **मोदींच्या स्वावलंबी होण्याच्या घोषणेचा अर्थ असा होता: "सरकार अदानी-अंबानींसारख्या धनदांडग्यांची तिजोरी भरेल, बाकीचे लोकांनी स्वत:च स्वत:ला सांभाळावे". आम्ही नरेंद्र मोदींना सांगू इच्छितो की आम्ही आमची काळजी घेऊ, तुम्ही कर वसूल करणे बंद करा! शेवटी, देशातील सर्व कारखाने, खाणी, शेते आणि कार्यालये आम्हीच चालवत आहोत. तुमचे काय काम? आधी तुम्ही स्वतः स्वावलंबी व्हा!**

देशातील ही रोजगार समस्या न सुटण्यासारखी नाही. भांडवली विकासाच्या विषमतेमुळे आज देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन अंधारात ढकलले गेले आहे. देशभरातील खेड्यापाड्यातील रुग्णालये, शाळा, वाहतूक आदी **मूलभूत गरजांवर जरी काम झाले,** तर लोकांच्या सुविधा तर वाढतीलच, पण या प्रक्रियेत **कोट्यवधी**

**नोकऱ्याही निर्माण होतील**. पण नफ्यावर आधारित या भांडवली व्यवस्थेत लोक आणि त्यांच्या गरजा लक्षात न ठेवता, नफा केंद्रस्थानी ठेवून कोणतेही धोरण आखले जाते. अनेक शिकल्या-सवरलेल्या लोकांना असेही वाटते की शेवटी यासाठी संसाधने कोठून येतील. विविधतेने नटलेल्या **आपल्या देशात ना पैशांची कमतरता आहे ना संसाधनांची**. गेल्या दहा वर्षातच देशातील भांडवलदारांना बेलआउट पॅकेज आणि करमाफीच्या रूपात 2.10 लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. 2015-21 मध्येच भांडवलदारांना दिलेली **10 लाख कोटींहून अधिक रक्कम बुडीत खात्यात** जमा करण्यात आली आहे. भांडवलदार वर्ग, नेते-मंत्री आणि नोकरशहा यांच्या उधळपट्टीवर आणि अमर्याद सुविधांवर आळा घातला तरी रोजगार निर्मितीसाठी भांडवल आणि संसाधने गोळा करता येतील. असंघटित क्षेत्रात 10-12 तास काम करणाऱ्या 50 कोटी लोकांना **8 तास काम करण्याचा कायदेशीर अधिकार दिला तरी किमान 12 ते 14 कोटी नवीन रोजगार निर्माण होतील.**

**लोकसंख्या वाढवून बेरोजगारीला आपणच जबाबदार आहोत, असेही म्हटले जाते!** सत्ताधाऱ्यांच्या या खोट्या दाव्याची चौकशी करुयात. मूल्यमापनासाठी स्वत:हून लोकसंख्या हा घटक नसून लोकसंख्येची घनता हा  घटक बनतो. रशियासारख्या भौगोलिकदृष्ट्या मोठ्या देशाची लोकसंख्या भारताइतकीच असती तर तिला जास्त मानले गेले नसते आणि जर नॉर्वेसारखी कमी लोकसंख्या तुवालूसारख्या छोट्या देशात राहत असती तर ती अधिक मानली गेली असती. **म्हणूनच आपण लोकसंख्येच्या घनतेला परिमाण मानले पाहिजे.** लोकसंख्येच्या घनतेबद्दल बोलायचे तर **नेदरलँड, दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर इत्यादी देशांची लोकसंख्या घनता भारतापेक्षा जास्त आहे. पण तेथील रोजगार दर भारतापेक्षा खूप जास्त आहे, राहणीमानाचा दर्जाही भारतापेक्षा खूपच चांगला आहे.** या देशांतही आदर्श लोकाभिमुख व्यवस्था नाही आणि तिथेही कामगार व कष्टकऱ्यांची लूट करणाऱ्या भांडवलदारांचेच शासन आहे, हे खरे आहे; पण लोकसंख्या हे बेरोजगारीचे कारण नाही हे सिद्ध करण्यासाठी त्यांची उदाहरणे पुरेशी आहेत. कारण असे असते तर या देशांमध्ये बेरोजगारी, भूक, निरक्षरता, असुरक्षितता आणि अनिश्चितता भारतापेक्षा जास्त असायला हवी होती. त्यांच्याकडे भारताइतकी आणि इतकी वैविध्यपूर्ण नैसर्गिक संसाधनेही नाहीत. यावर गांभीर्याने विचार करा. **माणसाचे मूल फक्त पोट घेऊनच जन्माला येत नाही, तर ते हात-पाय आणि मेंदूही घेऊन जन्मते. मनुष्य केवळ संसाधने वापरत नाही तर तो संसाधने तयार देखील करू शकतो. जितके लोक असतील, तितक्या गरजा असतील आणि भारतासारख्या सुजलाम-सुफलाम धरतीवर जिथे बहुतांश**

**मूलभूत संसाधनांची कमतरता नाही, तिथे जर अशी लोकाभिमुख व्यवस्था असेल जिचे उद्दिष्ट काही धनपशूंचा नफा नसून सामाजिक गरजा पूर्ण करणे आहे, तर कोणतेही कारण नाही की देशात एकही व्यक्ती बेरोजगार, उपाशी किंवा बेघर राहील. राज्यकर्ते लोकसंख्येचा युक्तिवाद यासाठी देतात की ते स्वतःच्या बिनकामी व्यवस्थेच्या अपयशाचे खापर जनतेच्या डोक्यावर फोडू शकतील.**

एकंदरीत, ही घोर मानवद्रोही नफाकेंद्री व्यवस्था स्वतःच्या अस्तित्वाच्या संकटाला तोंड देत आहे. किंबहुना, जगभरात आणि आपल्या देशात जातीय आणि धार्मिक कट्टरतावादी आणि फॅसिस्ट राजवटींचा उदय हा या आर्थिक आणि राजकीय संकटाचाच परिणाम आहे. या व्यवस्थेकडे मानवी सभ्यतेला देण्यासारखे काहीच सकारात्मक उरलेले नाही. ती फक्त भूक, कुपोषण, गरिबी, महागाई, बेरोजगारीच देऊ शकते. या व्यवस्थेचा क्रांतिकारी पर्याय तयार करणे हे देशातील विद्यार्थी-युवक आणि कष्टकरी जनतेचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, परंतु ते दीर्घकालीन उद्दिष्ट साध्य करण्याचे शिक्षण आणि तयारी सुद्धा आपल्याला दैनंदिन जीवनाच्या न्याय्य मागण्यांवर वर्तमान सरकार आणि व्यवस्थेशी लढूनच मिळेल. विद्यार्थी-युवक, कष्टकरी जनतेने ज्या मूलभूत हक्कांसाठी लढायचे आहे, त्यापैकी एक प्रमुख मागणी म्हणजे 'सर्वांना समान आणि मोफत शिक्षण आणि सर्वांना रोजगाराची कायदेशीर हमी'. यासाठी लढा उभारून आपण संपूर्ण व्यवस्था बदलण्याचा लढाही पुढे नेऊ आणि आपले मूलभूत हक्कही मिळवू.

रोजगाराच्या प्रश्नावर आपल्या लढ्याचे उद्दिष्ट साधे आणि सोपे आहे: **मनरेगा सारख्या योजनेद्वारे जर व्यवस्थेने मानले आहे की  ग्रामीण भागात नागरिकांना कामाचा अधिकार मिळाला पाहिजे (जरी सरकारने त्यांना 100च दिवसांचे काम देऊन त्यांची क्रूर चेष्टा केली आहे, आणि ते काम सुद्धा खरेतर अधूनमधूनच मिळते) तर मग या तर्काने व्यवस्थेने देशातील सर्व नागरिकांप्रती आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि रोजगार हमीचा हक्क हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार म्हणून स्वीकारला पाहिजे व त्यानुसार घटनेत दुरुस्ती झाली पाहिजे. पुढे जाऊन, या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी 'भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा' (Bhagat Singh National Employment Guarantee Act, BSNEGA, बसनेगा) संमत झाला पाहिजे.** या कायद्यानुसार प्रत्येक सक्षम नागरिकाला रोजगार उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी असली पाहिजे आणि जर रोजगार देऊ शकत नसेल तर त्याला किमान रु. 10,000 बेरोजगार भत्ता दिला गेला पाहिजे.

# आमच्या प्रमुख मागण्या

वरील चर्चेच्या आधारे, भगतसिंह जनअधिकार यात्रा मोदी सरकार आणि सर्व राज्य सरकारांकडे शिक्षण आणि रोजगाराबाबत पुढील मागण्या करत आहे.

**1. घटनादुरुस्ती करत 'प्रत्येक सक्षम नागरिकाला खातरीशीर रोजगार आणि सर्वांना समान व मोफत शिक्षण' या अधिकाराचा समावेश मूलभूत अधिकारांमध्ये करा.**

2. शिक्षणाचे खाजगीकरण तत्काळ थांबवा, संपूर्ण देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करा आणि ती सर्वांसाठी समान आणि मोफत करा.

3. खाजगी शिकवणी आणि कोचिंग सेंटर्सची मनमानी लूट थांबवण्यासाठी नियम बनवावेत.

4. सरकारी शाळांची जीर्ण स्थिती सुधारावी. **सर्व शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावीत** व निश्चित दर्जानुसार शिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी. शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या किमान 6 टक्क्यांपर्यंत वाढवावा.

5. प्राथमिक पासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाचे वाढते खाजगीकरण आणि व्यापारीकरण थांबवा. प्रत्येक नागरिकाला दर्जेदार व मोफत शिक्षण मिळावे यासाठी खाजगी शाळा-महाविद्यालये, वैद्यकीय-दंतवैद्यकीय, अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील शिक्षकांच्या सुविधा व वेतनाचा दर्जा निश्चित करण्यासाठी कायदा करावा. उच्च शिक्षणात केंद्रीय व सरकारी विद्यापीठातील सर्व रिक्त पदांवर कायमस्वरूपी शिक्षकांची तत्काळ भरती करण्यात यावी.

6. जनविरोधी नवीन शैक्षणिक धोरण-2020 रद्द करण्यात यावे.

7. शिक्षणाला अंगमेहनतीशी जोडले जावे, लष्करी प्रशिक्षण सक्तीचे केले जावे. शिक्षण वैज्ञानिक व तार्किक केले जावे आणि त्याला पूर्णपणे लोकशाही व धर्मनिरपेक्ष स्वरूप दिले जावे. शिक्षणाच्या अभ्यासक्रमातून सर्व प्रकारचे धार्मिक मिथकीय साहित्य आणि धर्मवाद तत्काळ वगळण्यात यावा.

8. ज्या उमेदवारांसाठी परीक्षा घेण्यात आल्या आहेत त्या पदांवर उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना तत्काळ नियुक्ती देण्यात यावी. रिक्त पदे जाहीर करण्यापासून ते नियुक्तीपत्रे देण्याच्या मुदतीपर्यंत कालमर्यादा आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. निकाल जाहीर झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत नियुक्तीपत्रे देणे बंधनकारक करण्यात यावे. ज्या पदांसाठी भरती परीक्षा घेण्यात

आलेल्या नाहीत अशा पदांसाठी त्वरित परीक्षा घेण्यात याव्यात.

9. सर्व सरकारी आणि केंद्रीय विभागातील लाखो रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

10. नियमित स्वरूपाच्या कामांमध्ये **कंत्राटी पद्धतीवर बंदी घालावी**, शासकीय विभाग व खाजगी उपक्रमात नियमित काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना तत्काळ कायम करण्यात यावे व अशा सर्व रिक्त पदांवर कायमस्वरूपी भरती करण्यात यावी.

11. देशातील शहरी आणि ग्रामीण बेरोजगारांच्या नोंदणीची व्यवस्था करण्यात यावी आणि जोपर्यंत रोजगार मिळत नाही तोपर्यंत किमान 10,000 रुपये बेरोजगार भत्ता देण्यात यावा. याची हमी देण्यासाठी सरकारने 'भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (बसनेगा)' पास केला पाहिजे. तोपर्यंत 'मनरेगा' अंतर्गत वर्षभराच्या रोजगाराची आणि कामासाठी किमान वेतनाची कायदेशीर तरतूद करावी. जोपर्यंत केंद्र सरकार असा कायदा करत नाही तोपर्यंत राज्य सरकारांनी असा रोजगार हमी कायदा राज्यस्तरावर लागू करावा.

12. बेरोजगार तरुणांकडून फॉर्म फीद्वारे दरवर्षी केली जाणारी हजारो कोटींची कमाई थांबवावी. नोकऱ्यांसाठी अवाजवी अर्ज शुल्क रद्द करावे आणि अर्ज विनामूल्य करावेत, तसेच मुलाखती आणि परीक्षांसाठीचा प्रवास विनामूल्य करावा.

13. देशाच्या विकासासाठी, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधांचे बांधकाम, गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रातील सुविधांच्या विस्तारासाठी नवीन रिक्त पदे काढून त्यावर भरती करण्यात यावी.

14. 'अग्निवीर' योजना तत्काळ रद्द करावी.

मित्रांनो, आपण अनेकदा स्वतःच विचार करतो की प्रत्येकाला शिक्षण आणि रोजगार देता येणे शक्य नाही, आणि ही जबाबदारी सरकारची नाही. खरे तर हा तर्क आपल्या मनात रुजवला गेला आहे जेणेकरून आपण तो आपला हक्क समजून त्याची मागणीच करू नये. पण सत्य काय आहे? कोणत्याही लोकशाही समाजात अन्न, वस्त्र, घर, आरोग्य आणि शिक्षण मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. आपल्यापेक्षा कमी संसाधने असलेले अनेक देश त्यांच्या नागरिकांना मोफत शिक्षण देतात. **सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी तीन गोष्टींची गरज आहे – काम करू शकणारे लोक, विकासाची शक्यता आणि नैसर्गिक संसाधने. या तिन्ही गोष्टी आपल्याकडे विपुल प्रमाणात आहेत**. प्रश्न सरकारांच्या हेतूंचा आहे. तो यावरून

ठरतो की व्यवस्था आण सरकार कोणत्या गटांचे प्रतिनिधित्व करतात: “जे सुईपासून जहाजापर्यंत सर्व काही स्वतःच्या श्रमाने बनवतात त्यांची की जे कष्टकरी लोकांच्या कष्टाची लूट करून तिजोऱ्या भरतात आणि परजीवी जळूसारखे देशाला चिकटून आहेत, त्यांची?” **‘रोजगार विरहीत विकासा’च्या भांडवली आणि लोकविरोधी धोरणांची अंमलबजावणी करण्यावर काँग्रेस-भाजपपासून ते सर्व रंगांचे झेंडे असलेल्या सर्व निवडणूक पक्षांचे एकमत आहे. ही लुटखोर धोरणे जोरात राबवणारा भाजप आज देशी-विदेशी भांडवलदारांचा सर्वात आवडता पक्ष आहे**. शिक्षण, रोजगार, महागाई या खर्या प्रश्नांवर जनतेने एकजुटीने आवाज उठवू नये यासाठीच भाजप आणि संघ परिवारातील सर्व संघटना धर्म, जात, भाषा, प्रदेशाच्या नावाखाली विविध खोटे भावनिक मुद्दे उपस्थित करून लोकांना आपापसात भांडवण्याचा आणि लोकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पण ही परिस्थिती शांतपणे स्वीकारायची का? हातावर  हात धरून बसावे का?** आज देशभरातील विद्यार्थी आणि युवक शिक्षण आणि रोजगाराशी संबंधित मागण्यांसाठी सरकारशी संघर्ष करत आहेत, परंतु आंधळे आणि बहिरे सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आहे. या मागण्यांसाठी व्यापक तयारी आणि एकजुटीने लढा उभारण्याची गरज आहे. भगतसिंह जन अधिकार यात्रेत आम्ही ही मागणी जोरदारपणे मांडत आहोत. भगतसिंह जन अधिकार यात्रेचे उद्देश आहे की आपण शिक्षण आणि रोजगार आणि इतर मागण्यांसाठी एकजूट, संघटित व्हावे आणि संघर्ष करावा. आम्ही सर्व विद्यार्थी, युवक आणि जागरूक न्यायप्रेमी लोकांना या यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन करतो.

**जगायचं असेल तर मरायला शिका, हक्कासाठी लढायला शिका!**

**वाऱ्याशिवाय ना पान हलते, लढल्याशिवाय ना काही मिळते!**

**भगतसिंहांनी दिला आवाज, बदला  बदला देश-समाज!**

**इंकलाब जिंदाबाद!**

"ज्या युवकांनी उद्या देशाच्या दोऱ्या हाती सांभाळायच्या आहेत, त्यांना आजच बुद्धीभ्रष्ट करण्याचे प्रयत्न चालू आहेत. याचा जो परिणाम होईल तो आपण स्वत:च समजला पाहिजे. आम्ही हे मानतो की विद्यार्थ्यांचे प्रमुख काम अभ्यास आहे, आणि त्यांनी त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे, पण देशाच्या परिस्थितीचे ज्ञान आणि तिला सुधारण्याच्या उपायांवर विचार करण्याची क्षमता निर्माण करणे , हे त्या शिक्षणात सामील नाही का? जर नसेल तर आम्ही त्या शिक्षणाला बिनकामी समजतो, जे फक्त कारकुनी शिकण्यासाठीच आहे"

- शहीद भगतसिंह

| यात्रेचा व्हॉलंटियर फॉर्म भरण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा.करा. | यात्रेबद्दल अधिक माहितीकरिता हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. | यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपसोबत जोडून घेण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. |
|---|---|---|

## आयोजक

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

## नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन

## संपर्क

**महाराष्ट्र:** परमेश्वर 7798364729, बबन 9619039793
**दिल्ली:** योगेश 9289498250, प्रियंवदा 9693469694
**उत्तर प्रदेश:** अमित 8858288593, अविनाश 9891951393
**हरियाणा:** इंद्रजित 8010156365, अजय 8685030984
**बिहार:** अजित 6297974751, वारुणी 7070571498
**उत्तराखंड:** कविता 9971158783, अपूर्व 7042740669
**पंजाब:** इंजिंदर 9888080820, सुखजिंदर 9815705653
**आंध्र प्रदेश:** श्रीनिवास 7995828171, अरुणा 8500208259
**तेलंगण:** आनंद 9971196111; **चंडिगढ:** शुभम 8196803093

WhatsApp Number : 9923875414    /bsjayatra